# तंत्र शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,

३,महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी – ३०२३३४७६, २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१ फॅक्स - २२६९०००७.

E-mail : desk16@dtemaharashtra.gov.in Internet :www.dtemaharashtra.gov.in


ईमेलव्दारे

क्रमांक : १६/आस्था/संकीर्ण/२०१८/८२
दिनांक : ५।४।२०१८

प्रति,

१) सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.

२) सचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,
मुंबई.

**विषय : विविध शासकीय कार्यालयात काम करणा-या महिलांच्या सुरक्षेसंदर्भात करावयाच्या उपाययोजना करणेबाबत...**

उपरोक्त विषयाबाबतचे उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे पत्र क्रमांक संकीर्ण-२०१८/प्र.क्र.३३-२०१८/आस्था-२, दिनांक २६.३.२०१८ व त्यासोबतचे मा. पोलिस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे दिनांक २२.२.२०१८ चे पत्र सोबत जोडत आहे.

सदर प्रकरणी मा. पोलिस आयुक्त, बृहन्मुंबई यांनी दिलेल्या सूचनांच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याबाबतचे उचित आदेश आपल्या स्तरावरून आपल्या अधिपत्याखालील संस्था / कार्यालये यांना देण्यात यावेत.

( सुचित्रा रणदिवे )
सहाय्यक संचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

---

पृष्ठांकन क्र. विकाऔ/शिक्षण/२०१८/१३३६
दिनांक : 18 APR 2018

या कार्यालयाच्या अधिनस्त येत असलेल्या सर्व शासकीय / अनुदानित व विनाअनुदानित पदवी, पदविका अभ्यासक्रमांच्या सर्व संस्था प्रमुखांना सुचित करण्यात येते की, विविध शासकीय कार्यालयात काम करणाऱ्या महिलांच्या सुरक्षेसंदर्भात करावयाच्या उपाययोजना करणे या विषयाबाबतचे उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे पत्र क्र. संकीर्ण -२०१८/प्र.क्र. ३३-२०१८/ आस्था-२ दिनांक २६-३-२०१८ व त्यासोबतचे मा.पोलिस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे दिनांक २२-०२-२०१८ चे पत्र सोबत जोडत आहे. सदरील परिपत्रकात दिलेल्या सूचनेनुसार सुरक्षेसंदर्भात उपाययोजना बाबत कार्यवाही करावी.

(महेश शिवणकर)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत :- या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.

# तंत्र शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,

३,महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी – ३०२३३४७६, २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१ फॅक्स - २२६९०००७.

E-mail : desk16@dtemaharashtra.gov.in Internet :www.dtemaharashtra.gov.in

ईमेलव्दारे

क्रमांक : १६/आस्था/संकीर्ण/२०१८/८२

दिनांक : ५।४।२०१८

प्रति,

१) सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.

२) सचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,
मुंबई.

**विषय : विविध शासकीय कार्यालयात काम करणा-या महिलांच्या सुरक्षेसंदर्भात करावयाच्या उपाययोजना करणेबाबत...**

उपरोक्त विषयाबाबतचे उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे पत्र क्रमांक संकीर्ण-२०१८/प्र.क्र.३३-२०१८/आस्था-२, दिनांक २६.३.२०१८ व त्यासोबतचे मा. पोलिस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे दिनांक २२.२.२०१८ चे पत्र सोबत जोडत आहे.

सदर प्रकरणी मा. पोलिस आयुक्त, बृहन्मुंबई यांनी दिलेल्या सूचनांच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याबाबतचे उचित आदेश आपल्या स्तरावरून आपल्या अधिपत्याखालील संस्था / कार्यालये यांना देण्यात यावेत.

**( सुचित्रा रणदिवे )**
**सहाय्यक संचालक,**
**तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई**

**प्रत : कार्यासन क्रमांक २, २अ व १०, मुख्य कार्यालय, मुंबई यांना माहितीकरिता सादर.**

महाराष्ट्र शासन

क्र.०२२-२२८५५९६६

पत्र प्राप्त झाले
27 MAR 2018
आवक लिपिक
तंत्र शिक्षण संचालनालय

क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.३३-२०१८/आस्था-२
उच्च व तंत्र तंत्रशिक्षण विभाग
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
४३१ (विस्तार), ४ था मजला,
मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक : २६ मार्च, २०१८

प्रति,

सहसचिव (विद्यापीठ शिक्षण / ग्रंथालये), उपसचिव (महाविद्यालयीन शिक्षण / आस्था / तंत्र शिक्षण / कला), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
संचालक (उच्चशिक्षण / तंत्रशिक्षण / कला / ग्रंथालये), महाराष्ट्र राज्य.
कुलगुरु, सर्व अकृषिक विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.

विषय : विविध शासकीय कार्यालयात काम करणा-या महिलांच्या सुरक्षेसंदर्भात करावयाच्या उपाययोजना करणेबाबत...

उपरोक्त विषयासंदर्भात पोलिस आयुक्त, बृहन्मुंबई यांनी कळविलेल्या सूचनांच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत गृह विभागाचे दि.२२/२/२०१८ चे पत्र सहपत्रासह सोबत पाठविण्यात येत आहे.

आपला,

सहपत्र : वरीलप्रमाणे

(सही)
(श्री.भ.पारनाईक)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :

उपसचिव, गृह विभाग यांना त्यांचे पत्र क्र.संकीर्ण २०१८/प्र.क्र.५६/विशा-६, दि.२२/२/२०१८ च्या अनुषंगाने माहितीसाठी अग्रेषित.

C:\Users\shirish.padolya\Documents\क्र CR__33__२०१८.docx

(32)

तंत्रशिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य, मुंबई
आवक क्र. ५८६७
दिनांक २८/०३/२०१८

## महाराष्ट्र शासन

क्र संकीर्ण ०११८/प्र क्र १६ /विशा ६
गृह विभाग, मंत्रालय,मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २२/०२/२०१८.
दु क्र ०२२-२२०२९४०७.
Email ID- home_special6@maharashtra.gov.in,

'28 FEB 2018

प्रति,

**अपर मुख्य सचिव**,उद्योग विभाग, मंत्रालय,मुंबई
**प्रधान सचिव**,सार्वजनिक आरोग्य विभाग,मंत्रालय,मुंबई
**प्रधान सचिव**,नगर विकास विभाग,मंत्रालय,मुंबई
**प्रधान सचिव**,शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई
**प्रधान सचिव**,उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई
**प्रधान सचिव**,परिवहन विभाग,मंत्रालय,मुंबई
**प्रधान सचिव**,कामगार विभाग, मंत्रालय,मुंबई
**पोलीस आयुक्त**,मुंबई
**विशेष पोलीस महानिरीक्षक**, ना.ह. सं. व म. अ. प्र. वि.,
**पोलीस महासंचालक** कार्यालय,मुंबई.

**विषय :** शासनाचे विविध विभाग/कार्यालये, खाजगी आस्थापना/कार्यालये यामध्ये काम करणाऱ्या महिला तसेच सार्वजनिक सेवेचा वापर करणाऱ्या महिला व बालकांच्या सुरक्षेसंदर्भात उपाययोजना करण्याबाबत.

संदर्भ : या विभागाची समक्रमांक दिनांक १६/०२/२०१८ व दिनांक २१/०२/२०१८ ची पत्रे.

महोदय,

वरील विषयावरील पोलीस आयुक्त,बृहन्मुंबई यांनी कळविलेल्या सुचनाच्या अनुषंगाने मा. अपर मुख्य सचिव (गृह) यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २१/२/२०१८ रोजी बैठकीत झालेल्या चर्चेनुसार आपल्या विभागाशी संबधित महिला व बालकांच्या सुरक्षेसंदर्भात उपाययोजना करणेबाबतच्या सूचना पत्रासोबत पाठविण्यात येत आहे.

आपल्या विभागाशी संबधित सुचना व्यतिरीक्त इतर सुचनांचा समावेश करावयाचा असल्यास त्याबाबत आपले स्तरावरून निर्णय घेऊन आपले अधिनस्त सर्व कार्यालये यांना कार्यवाही करणेबाबत कळविण्यात येऊन त्याची प्रत या विभागास पाठवावी हि विनंती.

आपला,

(व्यंकटेश भट)
उप सचिव,महाराष्ट्र शासन

F:\data backup\nawale\letter\वस्तुस्थिती.docx3

**शालेय शिक्षण विभाग, उच्च शिक्षण व तंत्रशिक्षण विभाग सचिव महाराष्ट्र राज्य, मुंबई व आयुक्त मुंबई महापालिका, मुंबई यांना शैक्षणिक परिसरात महिलांच्या छेडछाडीस प्रतिबंध करण्याबाबत सूचना**

१) मुंबईतील सर्व विद्यापीठे, महाविद्यालय, शाळा व इतर शैक्षणिक संस्था यामध्ये महिला छेडछाडीस प्रतिबंध होण्यासंदर्भात आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात. ,

२) सर्व शैक्षणिक संस्थांच्या इमारतीचे, प्रवेशद्वार , बाहेरील/आतील परिसर व मैदानी परिसरात पुरेशा संख्येने सी.सी.टि.व्ही. कॅमेरे बसविण्याचे संस्थेच्या प्रमुखांना कळविण्यात यावे.

३) शालेय विद्यार्थांच्या संरक्षण आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने शैक्षणिक संस्थेच्या इमारतीच्या भोवती सुरक्षित भिंतीचे कुंपन असावे. तसेच सुरक्षितेतेच्या दृष्टीने उपाययोजना कराव्यात.

४) सर्व शैक्षणिक संस्थेच्या प्रवेशद्वारावर व इमारतीत दर्शनी ठिकाणी स्थानिक पोलीस ठाणेचे दूरध्वनी क्रमांक, पोलीस नियंत्रण कक्षाचे दूरध्वनी क्रमांक, महिला/बालक हेल्पलाईन क्रमांक, बालकांसाठी काम करणाऱ्या NGO चे संपर्क क्रमांक ठळकपणे दिसतील असे फलक लावण्यात यावेत.

५) सर्व विद्यार्थांना विशेषत: मुलींना स्वसंरक्षण कौशल्य आणि तंत्रज्ञानावरील प्रशिक्षण देण्याबाबत विचार करावा.

६) संस्थेच्या सर्व कर्मचारी वर्गाला वेळोवेळी महिला अत्याचारा संबंधित तसेच बालकांवरील अत्याचारा संबंधित कायद्यांची माहिती देऊन , त्यांच्या मध्ये संवेदनशीलता/जागरूकता निर्माण करावी.

७) शैक्षणिक संस्थाचालक व विश्वस्त हे विद्यार्थांच्या सुरक्षिततेसंदर्भात जागरूक असावेत.

८) शालेय कर्मचारी वर्गाने पोलीस व NGO मदतीने विद्यार्थामध्ये लैंगिक अत्याचाराच्या घटनांबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी तसेच अशा घटना घडल्यास त्याची माहिती तात्काळ संबंधितांना कळविण्याबाबत माहिती देण्यात यावी.

९) शिक्षण संस्थेने विद्यार्थाच्या cyber stalking कडे लक्ष पुरवावे. तसेच त्यांना सायबर गुन्हया संदर्भात असलेल्या तरतूदीबाबत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृत करण्यात यावे.

१०) संस्थाचालक, विश्वस्त व शालेय कर्मचारी यांना बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण अधिनियम २०१३ (पोक्सो) कायद्यातील तरतुदींची माहिती असावी.

११) सर्व शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे व इतर शैक्षणिक संस्था यामध्ये "अंतर्गत तक्रार समिती" (Prevention of sexual harassment of women at workplace Act २०१३) स्थापन झाली आहे याची शहानिशा करून घ्यावी. जर समिती स्थापन झाली नसेल तर अशा समित्या तातडीने स्थापन करण्यास सर्वांना बाध्य करावे.